**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – विनोद भाऊराव पाटील.

**वय** – ६४ वर्ष, **व्यवसाय** – सेवानिवृत्त शासकीय लेखापाल,

**राहणार**– विजयनगर, ता. मिरज, जि. सांगली.

**सरतपास– श्री. एस. आय. सावंत, वकील.**

**१.** माझे एम. कॉम. चे शिक्षण झाले आहे. मला लेखापरीक्षणाचा २८ वर्षांचा साधारणपणे १००० ते ११०० परीक्षणांचा अनुभव आहे. मी संपुर्ण कालावधीत ८ संस्थांच्या विरोधात अपहाराच्या तक्रारी दिल्या आहेत. आमच्या लेखापरीक्षण नियुक्तीचे आदेश जिल्हा विशेष लेखा परीक्षक– वर्ग २ यांच्याद्वारे दिले जातात. आम्ही त्यांच्या आदेशा प्रमाणे काम करतो. मी २०१५ पासून कोल्हापूर जिल्हयात नोकरी करत होतो. त्यावेळी दि.०९.०५.२०११ रोजी विशेष कार्यकारी अधिकारी, लेखापरीक्षा मंडळ (पदुम) मुंबई यांनी मलिग्रे येथील रवळनाथ सहकारी दूध संस्थेच्या २०१८ सालच्या फेरलेखापरीक्षणाचा आदेश दिला होता. ते फेरपरीक्षण २०१२ ते २०१७ पर्यंतच्या कालावधी करीता करायचे होते. त्याबाबत त्यांनी सन २०१२ ते २०१६ करीता एक आदेश व २०१६ ते २०१७ करीता स्वतंत्र आदेश दिला होता. आता मला ते दोन्ही आदेश दाखवले. त्यांना अनुक्रमे **नि. क्र. पी.१०१ व १०२** देण्यात येतात.

२. मी त्याप्रमाणे दूध संस्थेचे फेरलेखापरीक्षण करुन दि.३०.११.२०१८ रोजी विशेष कार्यकारी अधिकारी, लेखापरीक्षा मंडळ (पदुम) मुंबई यांना अहवाल सादर केला होता. मी केलेल्या लेखापरीक्षणामध्ये २०१२ ते २०१६ या कालावधीत एक संचालक मंडळ आणि २०१६ ते २०१७ वर्षाकरीता दुसरे संचालक मंडळ कार्यरत असलेले अहवाल करावे लागले होते. सन २०१२ ते २०१६ या काळात दिलीप बुगडे हे चेअरमन आणि विठ्ठल बुगडे हे सचिव होते. त्यावेळी इतर आरोपी संस्थेचे संचालक होते. सन २०१६ ते २०१७ दरम्यान विजय कागीनकर चेअरमन आणि महादेव बुगडे सचिव होते. त्यावेळी इतर आरोपी संचालक होते.

**३**. मी सदर फेरलेखापरीक्षण दि.०१.०४.२०१२ ते ३१.०३.२०१७ दरम्यान केले होते. मला त्या लेखापरीक्षणामध्ये दोन्ही काळातील चेअरमन, सचिव व संचालक यांनी चुकीचे आर्थिक व्यवहार केल्याचे आढळून आले होते. त्यांनी प्रत्यक्ष झालेली विक्री कमी दाखवून चुकीची आर्थिक विवरणपत्रे केली होती. त्यांच्या मार्फत संस्थेच्या पशुखाद्याच्या विक्री मध्ये रक्कम जमा न करता परस्पर पशुखाद्य घेतल्याचे आढळून आले होते. त्यांनी सदर अपहार प्रत्येक वर्षामध्ये केला होता. दि.०१.०४.२०१२ ते ३१.०३.२०१७ पर्यंतच्या दरम्यान सदर संस्थेच्या चेअरमन, सचिव आणि संचालकांनी वर्षाच्या अखेरचा साठा निरंक करुन त्याच्या नोंदी किर्द रजिस्टरला घेतल्या नव्हत्या. मी त्याबाबतच्या अपहाराच्या अहवालात नोंदी केलेल्या आहेत.

**४**. मी सदर अहवाल करण्यासाठी डेअरी रजिस्टर, स्टॉक रजिस्टर, किर्द, व्हाऊचर्स, जमा पावत्या आणि जनरल लेजर यांची पडताळणी केली होती. मी सदर ऑडिट संस्थेत बसून करत होतो. त्यावेळी सर्व कागदपत्रे त्यावेळच्या सचिवांच्या ताब्यात होती.

(सरकारी विधिज्ञांच्या तोंडी विनंती वरुन सरतपास पुढील तारखे पर्यंत तहकूब.)

**सरतपास अपुर्ण.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १६.०६.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.